# शुभं - वास्तु

## वृक्षपरिसर - वास्तू आणि बगीचा

वास्तुपरिसरात कोणते वृक्ष असावेत आणि कोणते वृक्ष असू नयेत याबाबत पूराणग्रंथात आणि आयुर्वेदात शास्त्रात विशिष्ट माहिती आढळते. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी झाडांची लागवड करणे फार अत्यावश्यक आहे.

श्लोक : भवनस्य वहः पुर्वे दिग्भागे सर्वकामिकः।
उदम्बरस्तयायाम्ये वारुण्यां पिंप्पल शुभंः ।। वृक्षार्वेद.

भवनाच्या उत्तरेला प्लक्ष (पिंपरी / पाईर) पूर्वेला वट दक्षिणेला औदुंबर आणि पश्चिमेला अश्वत्य यांचा स्थापना उत्तम फल देणारी ठरते.

१. काटेरी, दूध असलेली अनुक्रमे झाडे शुत्रुभय, संपत्तीत हानी आणि अपत्यहानी करणारी असल्यामुळे ती घराचे सानिध्यात नसावीत.
२. बोरी, केळी, लिंबू इ. वृक्ष घराच्या नजीक नसावीत.
३. कोणत्याही वृक्षाची सावली प्रवेशद्वार व घरावर पडू नये.
४. घराचे दक्षिण नैऋत्येस आणि ईशान्येस बगीचा (फुलबाग) निशिध्द समजावी.
५. घराचे पश्चिम, उत्तर, पूर्वेस प्रशस्त होय (फूलबाग)
६. घराचे प्रवेशद्वारासमोर सोने देणारे झाड असले तरी नसावे
७. काटेरी झाडांमध्ये केवळ गुलाब व कोरफड घराभोवती असणे चालते.
८. उत्तरेस पाण्याचा हौद करुन कमळरोपन करावे लक्ष्मीदायक असते.
९. घराभोवती नागकेशर, आंबा, अशोक, चंदन. नारळ, आग्नेयला डाळींब वायव्येला बिल्ववृक्ष ईशान्येला आवळा हे वृक्ष शुभप्रद होय.

## प्रमुख वास्तुदोष

१. ईशान्येला संडाव वा सेप्टीक टँक अशा स्थितीत माणसाच्या चारित्र्यावर व नीतीमत्तेवर घाला पाडून त्याच्या वैयक्तीक सांसारिक जीवनावर गंभीर परिणाम होताना दिसतात. समाजात मानहानीचे प्रसंग येतात. बुध्दीभ्रंश होवून चंचलपणाचे चुकीचे निर्णय बुडत्याचा पाय खोलात जातांना दिसतो.
२. नैऋत्येस मोठा खड्डा अशा स्थितीत कर्त्या पुरुषाचा मृत्यू , धंदा-व्यवसायात अपरिमीत हानी, अपघातांची मालिका, मृत्यूवत त्रास, घरातील लहान मुलांना फेफरे येणे, तोतरेपणा येतो, निद्रानाश अशी अनेक संकटे येतांना दिसतात.
३. उत्तरेस डोंगर वा टेकडी सर्व शुभ घटना ठप्प होवून सुखाचा नाश होतो. भावाभावात भांडणे होतात. मातेचे सुख हरपते. मुलांना विद्याभ्यासात अडचणी संभवतात. एकूण मानसिक क्लेश होतात.
४. चंबकीय अक्ष व भौमितीक अक्षात भेद (विदीशा),
५. अग्नेयेस विहीर, बोअर असणे.
६. दक्षिणेला उतार,
७. दक्षिण व्याघ्रमुख,
८. मर्मदोष
९. भूमीदोष इ. प्रमुख वास्तूदोष मानले जातात.

## १. विविध ऊर्जा व उपाय

१. धनाकर्षण :-
श्री यंत्र स्थापना व श्री ललिता सहस्र नामावली स्त्रोत्र
धनाकर्षण यंत्र स्फटिकावर कोरलेले.
दक्षिणावर्ती शंख व मोती गल्ल्यात ठेवणे.
रत्न वापर
तांत्रिक उपाय
संपुट लावून नवचंडी
श्री सुक्त रोज पठण
श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र अध्याय १६ वा

२. ऐश्वय ऊर्जा :-
गुरु साधना
गुरु मंत्र साधना
संपुट लावून शतचंडी
सुगंधी पुष्टी वर्धनम्
घोरात कष्टात स्तोत्र पठण (रोज)
श्री. श्री. च. अध्याय २३ वा

३. सुख ऊर्जा
कुळस्वामीनी साधना कुळस्वामीनी दर्शन
नारायण सेवा
११ कुमारिका भोजन व दान
श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत पहिला अध्याय स्तोत्र

४. आरोग्य ऊर्जा :-
ओंकार साधना
योगा / आसने
रोज रुद्र पठण
योग्य रत्नाचा वापर
योग्य रुद्राक्षाचा वापर
वास्तुदोष निवारण
जी.एस.एच.ट्रिटमेंट-रुद्राक्ष,
तांत्रिक उपाय
श्रीपाद व श्रीवल्लभ चारित्रामृत अध्याय १२ वा
श्री ज्ञानेश्वरीतील अध्याय १-१ ते २१ ओव्या, अध्याय १८-१ ते १० ओव्या.

## २. विविध ऊर्जा व उपाय

५. संतती वृध्दी ऊर्जा :-
श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत अध्याय ८ वा
श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत अध्याय ९ वा
नारायण नागबळी
कालसर्प शांती
सर्प शांती विधी ( श्री.के.के. सुब्रह्मण्यम्)
रद्राक्ष धारण करणे.
योग्य रत्न वापर

६. संतती सुख ऊर्जा :-
नवनाथ भक्तिसार अध्याय २८ वा
श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत अध्याय २४ वा
श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत अध्याय २८ वा
श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत अध्याय ३३ वा
योग्य रुद्राक्ष वापर
योग्य रत्न वापर
श्री ज्ञानेश्वरीतील १ ते २१ अध्याय-११, १६५ ते १९६ ओव्या रोज.

८. यश-मत्सर ऊर्जा :-
टायगर आय स्टोन वापर
टायगर आय ट्री वापर यश मत्सर, ऊर्जा लिक्वीड स्प्रे टेबलाला टायगर आय लावणे.
टायगर आय ट्री ठेवणे, अत्तर, गायत्री मंत्र.
ओंकार साधना
कॅट आय स्टोन वापर

९. अन्नपुर्णा ऊर्जा :-
अन्नपुर्णा स्तोत्र अन्नपुर्णा
अन्नपुर्णा पूजा प्रतिदिन तर्क शुध्द खाणे
नारायण सेवा गोरगरिब अग्नी होम
गुरुस नैवेद्य प्रतिदिन गॅस पूजा, अग्नी, अग्नीपासून पूजा (अग्नीत घास)

१०. ग्राहक समाधान ऊर्जा :-
डॉ. व्यवसाय, मॉल याठिकाणी असतो.
धूप (रोज/ठराविक वारांचा) लावणे.
सुगंधी अत्तरांचा उपयोग रोगसंगती बदल
संध्याकाळी श्री सूक्त पठण
ईशान्येत पाणी साठी (Water body ) निर्माण करणे.

## ३. विविध ऊर्जा व उपाय

११. ग्राहक समाधान ऊर्जा :-

वातावरण प्रसन्न ठेवणे. (मधुर संगीत, ओंकार इ.), बैठक व्यवस्था बदलणे. स्वच्छता ठेवणे.
सुगंधी द्रव्याचा वापर

१२. परस्पर संबंध ऊर्जा :-

सर्वजण एकत्र जेवणे
वास्तु-खुणा

वरील सर्व ऊर्जा या आपल्या भूमी/फ्लॅट/प्लॉट/व्यवसायांच्या ठिकाणी लेचर अँटीना, डाऊझिंग या साधनांनी चेक करुन उपाययोजना करणे हितावह ठरते.

## वास्तुमुहूर्त

वास्तुमुहूर्तासाठी वैशाख, ज्येष्ठ, श्रावण. कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ व फाल्गुन हे महिने योग्य असतात. चतुर्थी, नवमी, चतुर्दशी, अक्षयतिथी, वृध्दि तिथीचे दिवस, कृष्ण त्रयोदशीपासून चार दिवस वर्ज्य आहेत. रविवार, मंगळवार, वैधृति-व्यतिपात व करिदिन वर्ज्य आहेत. अश्विनी, रोहिणी, मृग, पुनर्वसू, पुष्य, उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती, अनुराधा, मूळ, उषा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, उत्तरा, उत्तराभाद्रपदा, रेवती ही नक्षत्रे ग्राह्य आहेत.

लग्नशुध्दी, मेष, कर्क, तुला, मकर (चर) लग्ने वर्ज्य आहेत. गृहप्रवेशास वर्ज्य करावीत. (वास्तू निक्षेपास लग्न शुध्दीची आवश्यकता नाही.)

३) गृहप्रवेश - पत्नीने मंगल कलश हातात घ्यावा व दुसऱ्या सुवासिनीने मंगल दीप घ्यावा. यजमानाने घरातील देव किंवा कुलस्वामीचा श्रीगणेशाचा फोटो घेवून ब्राह्मणांसह समंत्रक घरामध्ये प्रवेश करावा. (समंगल घरामध्ये प्रवेश म्हणजे गृहप्रवेश होय.) उंबऱ्याची पूजा, तोरणाची पूजा, केरसुणी (लक्ष्मी) पूजा करावी. धान्याने भरलेले माप लवंडून प्रवेश करावा.

४) गृहप्रवेश करताना घराचे द्वार कोणत्या दिशेस आहे, यास महत्त्व नाही.

५) वास्तुशांतीतील संपूर्ण धार्मिक विधी पुढीलप्रमाणे आहेत.

६) वास्तुशांती गृहप्रवेशांग असल्याने अग्नी असण्याची जरुरी नाही.

७) सर्व - शांती - मंगळ राहू व केतू यांच्या सुर्या, आहूति येत असल्यास त्या ग्रहाची लोखंडीची प्रतिमा करुन त्याचे पूजन करुन ती प्रतिमा जमिनीवर पालथी घालून त्यावर स्थंडिल करावे.

८) वास्तुनिक्षेप हा अग्नेय कोपऱ्यातच करावा व सुवर्ण या धातूचीच वास्तुप्रतिमा पालथी ठेवावी.

# शुभं - वास्तु

## वास्तुरचनेस आरंभ करण्यापूर्वी

१. होकायंत्राच्या साहाय्याने दिशा निश्चिती अत्यंत महत्त्वाची असते.
२. वास्तु – बांधणेसाठी निवडलेली भूमी वास्तुतज्ज्ञाकडून परिक्षण करुन घेणे हितावह ठरते.
३. प्लॅन काढताना पूर्ण वास्तुशास्त्रानुसार काढणे हितावह ठरते.
४. प्लॅन काढताना पूर्ण जागेचे ८१ भाग करुन यामध्ये षन्महान्ति महामर्म व उपमर्म, शिरा व अनुशिरा यांचा अतिसंवदनाशील भाग वर्ज्य करुन प्लॅन काढावा.
५. जमिनीचा उतार उत्तर व पुर्वेस करुन घ्यावा.
६. भूमी पूजनासाठी उत्तम मुहूर्त पाहूनच आरंभ करावा.
७. संपूर्ण वास्तू अधिकाधिक दक्षिण पश्चिमेस ठेवून उत्तर–पूर्वेस अंतर मोकळे सोडावे.
८. खोदाई ईशान्येकडून (घड्याळाच्या काट्याप्रमाणे) करावी.
९. पायाभरणी मात्र आग्नेयेपासून सुरु करावी.
१०. प्रथमतः संपूर्ण वास्तूला वॉल कंपाऊंड करुन घेणे अधिक हिताचे असते.
११. तयार प्लॅट अथवा घर घ्यावयाचे असल्यास वास्तुतज्ज्ञांना दाखवूनच घ्यावे.
१२. मानवी जीवनात जसे १६ संस्कारामाला महत्त्व आहे तसे वास्तुसंबंधात काही संस्कार शास्त्रामध्ये नमूद केले आहेत.

नाभीकुरण, पदनिहाय बलिदान , भूमिपरिक्षण (शंकुस्थापना), पायाभरणी शिलान्यास (नंदाप्रतिष्ठापना/प्रेथमेष्टका) भूमिपूजन, दिगरक्षण इ. संस्कार प्रमुख्याने भूमीचे होणे अतिशय गरजेचे असते.

१३. दक्षिण, पश्चिम बंद न केलेले बांधकाम दुप्पट वेळ व पैसा घालवते.
१४. भूमिपूजन पायाभरणी, चौकट बसविणे व स्लॅब टाकताना वास्तुशांती या वेळेस शुभ मुहूर्त पाहणे जरुरीचे असते.
१५. धनिष्ठा पंचक असताना भूमिपूजन / पायाभरणी करु नये.

# शुभं - वास्तु

## वास्तू आणि चित्रकर्म पुरातनग्रंथ

## शुभं - वास्तू व शास्त्रींचे मते -

संग्रामं मरणं दुःख । देवासुरकथान्वितम् ।
नग्नं तपस्विलालां चा भयान्यादि न योजनेत (मयमत्)

१. युध्दाची चित्रे मरण व दुःख दर्शविणारी दुःखी व्यक्तीची चित्रे, देवदेवतांची कथा सांगणारी दृष्ये, नग्न अवस्थेतील चित्रे–तपस्वितांच्या लीला दर्शविणारी चित्रे नसावीत.
२. ताजमहल प्रतिकृती चालते एतिहासिक देखावे यांमधून स्फूर्ती चैतन्य मिळत असणारी चित्रे असावीत.
३. घरामध्ये मृत व्यक्तींचे फोटो लावू नयेत. विशेष करुन अकाली अथवा अपघाती मृत्यू झालेल्यांचे फोटो मुळीच लावू नयेत.
४. मृत व्यक्तींचे फोटो लावणे अपरिहार्य असल्यास उत्तर भिंतीवर दक्षिणेस तोंड करुन लावावे.
५. व्यावसायिक जागांमध्ये जे प्रोडक्ट विकू इच्छितो त्यांची पोस्टर्स वायव्य भागात लावावी.
६. आपल्या कार्यालयात पाठीमागील भिंतीवर आदर्श असलेल्या व्यक्तींचा फोटो लावणे प्रेरणादायी असतो.
७. डोंगर घाट अतिभव्य खडक अथवा उंच गगणचुंबी या चित्रामध्ये खोल खड्डा (दरी) अथवा पाणी मुळीच नसावे.
८. सकारात्मक शुभप्रवाहित सात्विक वातावरण निर्मिती होत असेल तर अशी चित्रे लावावीत. परंतू पिंजऱ्यात अडकलेला प्राणी रडणारे मूल, वादळ, हिंसाचार, युध्द, गरिबी, रोगराई, ओसाड जंगले, उपासमारी दर्शविणारी महिला, पुरुष मुले, भिक मागणारी मुले, काळ्या रंगाचा अतिवापर केलेली चित्रे नकोत विशेषतः गोडवा–प्रसन्नता विचलीत करणारी चित्रे असूच नयेत.

शास्त्रींनी शुभं–वास्तु तत्वे प्राचीन / पुरातन वास्तुशास्त्राशी सहज जुळणारी आहेत. शुभं–वास्तु प्राचीन ग्रंथांशीच निगडीत आहे. तसेच ती ब्रह्मांडीय ऊर्जेवर आधारीत आहे. आपण योग्य गृह, तत्व, ऊर्जा आणि दिशा यांचा समेळ जुळवून संतूलित करुन आणि चक्रांसह जागृत करुन ब्रह्मांडीय ऊर्जाच्या अनंत शक्तीशी समन्वय साधू शकता.

शुभं–वास्तुची तत्वे आपल्या घरात व्यवसायाच्या ठिकाणी सरळ आणि सोप्या पध्दतीने आंमलात आणण्याचे मार्ग दर्शविते.

आपणास माहित आहे का ?

शुभं–वास्तु ची तत्वे अवलंबल्यानंतर आपण आपल्या जीवनाशी संबंधीत समस्या ९ ते १८० दिवसात सोडवू शकता. संपूर्ण आयुष्याच्या समस्यांमध्ये आरोग्य समस्या, आर्थिक समस्या, शैक्षणिक समस्या, विवाह समस्या, गृहकलह, अशांतता, नात्यातील समस्या, नोकरी किंवा करिअरच्या समस्यांचा समावेश आहे.

# शुभं - वास्तु

## खालील प्रमाणे शुभं-वास्तुच्या टिपा ज्या आपल्या घरात सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह बळकट करतील

१. नकारात्मकता दूर करण्यासाठी मीठ वापरा

शौचालयात मीठ ठेवल्यास घरातून नकारत्मकता दूर होण्यास मदत होते. मीठ दर काही दिवसांनी बदलले पाहिजे. या व्यतिरिक्त, जर आपल्या कुटूंबातील एखाद्या सदस्य फार चिंतातूर-उदास असेल तर त्याच्या किंवा तिच्या भोवती गोलाकार ३ ते ५ वेळा फिरवावे आणि नंतर पाण्यात किंवा अग्नीत सोडावे. हा उपाय व्यक्तीच्या सकारात्मकता वाढविण्यास आमि मानसिक स्थिती सुधारण्यास मदत करु शकते.

२. आपले घर स्वच्छ, हवेशीर आणि प्रसार मुक्त ठेवा

शुभं-वास्तुनुसार आपल्या घराचे वातावरण स्वच्छ - सुंदर आणि व्यवस्थित वस्तु - फर्निचर - काढा. जुन्या आणि रद्दी वस्तुंची विल्हेवाट लावा आणि ब्रह्मांडीय उर्जेचा प्रवाह सुरळीत होण्यास पुरेशी जागा असल्याचे सुनिश्चित करा. मुख्य दरवाजासमोर कोणताही अडथळा नको. स्तंभ-पिलर-खांब-झाड, भिंत वेल इत्यादी द्वारवेध दोष तयार होतो यास्तव अडथळे टाळा.

मुख्यद्वारास लाकडी उंबऱ्याचाच वापर करा व त्याखाली स्वस्तिक ताम्र पट्टीचा अवलंब करा व चौकटीवर दुर्गाद्वार यंत्र लावा. चौकटीस रुद्राक्ष तोरणाचा वापर करा.

✻ योग्य चित्रे आणि वॉल - हँगिंग्ज वापरा

वाहते पाणी, धावणारे घोडे, पक्षांची जोडी, श्रीयंत्र, कुबेर, सुर्यचित्र, या सारख्या शांततापूर्ण वातावरणाला प्रोत्साहन देणारी चित्रे, प्रतिमा प्रदर्शन किंवा वॉल-हँगिंग्ज लावा.

✻ नेहमी आपल्या अनुकुल दिशांनाच सामोरे जा

✻ आपल्या जन्मकुंडीलवरुन अंकशास्त्रावरुन महत्त्वाचे कामासाठी योग्य दिशा - मुहूर्तांचा अवलंब करा.

✻ आपल्या चपला (पादत्राने) घराबाहेर काढा

आपल्या घराच्या वातावरणाची शुध्दता आणि सकारात्मक उर्जा राखण्यासाठी आपल्या चपला घराबाहेर काढा. घाण, धूळ, चिखल आणि नकारात्मक ऊर्जा आणते जे आपल्या घरातील वातावरणाच्या पावित्र्यात उडथळा आणते.

वरील टीपांचे अनुकरण करुन आपण आपल्या घरात एक सकारात्मक वातावरण तयार करु शकता. आपल्या जिवनात शुभं-वास्तुचा अवलंब करा आणि ९ ते १८० दिवसात दोषमुक्त व्हा आणि दिव्य सकारात्मक अनुभवा. एकदा अंमलात आणा. आजीवन फायदा घ्या. आपल्या सकारात्मक जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारी ब्रह्मांडीय ऊर्जा संतुलीत करुन आपण सर्व समस्यांवर निश्चीतच मात करु शकता.

३. नवीन घर / ऑफिस / प्लॉट घेताना ती निर्दोष कसी असावी यासंबंधी सल्ला व मार्गदशन

४. आपल्या घर - वास्तु - ऑफिस - व्यावसायिक जागेमध्ये ठेवण्यासाठी एक शुभं-वास्तु द्वारे दिव्य कोट

५. वास्तुतील सर्व समस्यांचे यथायोग निवारण.

# शुभं - वास्तु

## ध्येय - उद्दिष्ट्ये

वास्तुशास्त्रं प्रवक्ष्यामी लोकांना हितकाम्यया

वास्तुशास्त्र हे मुळातच लोकहितैशी आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या मनात स्वतःच्या घराबद्दल एक निश्चित संकल्पना असते परंतू वास्तुमध्ये राहावयास गेल्यानंतर बराच कष्ट करावे लागते. यातून संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी आपल्या ऋषि मुनींनी वास्तुशास्त्राची माहिती स्पष्ट केली आहे. यातुनच हजारो वर्षापुर्वी वास्तुशास्त्राची महती उपयुक्त आहे. यातून संपूर्ण मानवजातीला वास्तुशास्त्रीय माध्यमातून स्थैर्य, मानव सुखी सर्वगुण संपन्न, श्रीमंत उत्तम आरोग्यवात व्हावा हीच शुभं–वास्तु द्वारे सेवा देण्याचा एकमेव आणि एकच प्रयत्न

१. आपले घर (वास्तू) आपल्या आयुष्याशी संबंधित समस्यांचा अंदाज लावून खात्रीशीर उपाय योजना :–

विवाह, शिक्षण, करिअर, लग्न, स्वप्नातील घर, नाते, आरोग्य संपत्ती, व्यवसाय...

वास्तु मार्गदर्शनासाठी.......कॉल करा....

२. लहान – मोठे व्यवसायासाठी शुभं–वास्तु

आपले कार्य स्थान आपल्या व्यवसायातील समस्यांचा अंदाज लावू शकते.

पैसा– करिअर, प्रसिध्दी, नातेसंबंध सलग १६ वर्षाच्या तपामध्ये हजारोंचे आयुष्य बदलले तुमचे का नाही बदलणार? तुमच्या वास्तुमध्ये तुम्हाला मानसिक स्वास्थ हवे असल्यास शुभं–वास्तु द्वारे आपल्या वास्तुचे परिक्षण करुन घ्या...